* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९७ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * सोमवार दि.०२ मार्च २०२६ | * पाने-४

# इराणचे सुप्रीम लीडर अयातुल्ला अली खामेनींचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – अमेरिका आणि इस्रायलचे इराणवर हल्ले सुरूच आहेत आणि इराण प्रत्येक हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देत आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांनी दावा केला आहे की इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांचा हल्ल्यात मृत्यू झाला. इराणी माध्यमांनी देखील खमेनी यांच्या मृत्युची पुष्टी केली आहे.

इराणी संविधानाच्या ''विलायत-ए-फकीह'' तत्वानुसार, सर्वोच्च नेत्याचे पद केवळ एक प्रमुख धार्मिक विद्वान (मौलवी)च भूषवू शकते. किंबहुना, खमेनी यांनी त्यांच्या हयातीत उत्तराधिकारी म्हणून नाव दिले नाहीत. इराणच्या इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या पदासाठी खमेनी यांच्यानंतर दोन नावे दावेदार म्हणून समोर येत आहेत. पहिले म्हणजे खमेनी यांचे पुत्र मोज्तबा खमेनी आणि दुसरे म्हणजे इराणचे संस्थापक अयातुल्ला खोमेनी यांचे नातू हसन खोमेनी.

वृत्तसंस्था रॉयटर्सच्या मते, सध्या कोणत्याही व्यक्तीला खमेनी यांचे अधिकार नाहीत. त्यामुळे, कोणत्याही उत्तराधिकाऱ्याला क्रांतिकारी रक्षक आणि प्रमुख धार्मिक संस्थांसारख्या शक्तिशाली संस्थांवर नियंत्रण मिळविण्यात मोठे आव्हान असेल. इराणची सत्ता ''तज्ज्ञांच्या परिषद'' द्वारे निश्चित केली जाते, ज्यामध्ये ८८ प्रमुख धार्मिक विद्वान (मौलवी) असतात. ही परिषद अधिकृतपणे नवीन सर्वोच्च नेत्याची निवड करते. तथापि, पडद्यामागे, खरी सत्ता देशाचे कामकाज चालविणाऱ्या ''शक्ती दलालांच्या'' हातात आहे.

इस्लामिक रेव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) इराणच्या निवडून आलेल्या सरकारच्या अधिकारक्षेत्राबाहेर काम करते आणि थेट सर्वोच्च नेत्याला जबाबदार असते. ही देशातील सर्वात शक्तिशाली आणि उत्तम सुसज्ज लष्करी शाखा आहे. रॉयटर्सच्या मते, शनिवारी झालेल्या हल्ल्यात आयआरजीसी कमांडर मोहम्मद पाकपौर देखील मारला गेला. या घडामोडीमुळे अंतर्गत शक्ती संतुलन बदलू शकते. तज्ञांचा असा विश्वास आहे की आयआरजीसी इस्लामिक रिपब्लिकचे भविष्य घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

दरम्यान अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे. खामेनी यांच्या मृत्यूमुळे इराण आणखी आक्रमक प्रतिहल्ले करत आहे. त्यामुळे आता अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे.

असं असताना आता अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचे पडसाद थेट पाकिस्तानात उमटले आहेत. पाकिस्तानच्या कराचीमधील अमेरिकन दूतावासावर जमावाने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. खामेनी यांच्या मृत्यूमुळे शिया समुदाय आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. या अनुषंगाने कराची येथील अमेरिकन



दूतावासावर काही जमावाने संतप्त होत सुरक्षा व्यवस्था भेदून आतमध्ये प्रवेश करत दगड आणि काठ्यांनी तोडफोड केली आहे.

तसेच अमेरिकन दूतावासाच्या कार्यालयाच्या काचा फोडत इमारतीला आग लावण्यात आली आहे. या संपूर्ण घटनेत ८ जणांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या संदर्भातील वृत्त पाकिस्तानी माध्यमांच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर सुरू केलेल्या हल्ल्यांच्या विरोधात पाकिस्तानात निदर्शने काढण्यात आले आहेत. या निदर्शनांदरम्यान अमेरिकन दूतावासाबाहेर निदर्शनांना हिंसक वळण लागलं आहे. यावेळी त्या ठिकाणी असलेल्या सुरक्षा रक्षक आणि निदर्शनकर्ते यांच्यात झालेल्या संघर्षात किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून ३० पेक्षा जास्त जण जखमी झाल्याचं वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, या घटनेवर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

## इराणच्या सर्वोच्च नेतेपदी अयातुल्ला अराफी!

अमेरिकेच्या हल्ल्यात अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर काही तासांतच, अनुभवी धर्मगुरू आणि खामेनी यांचे जवळचे सहकारी अयातुल्ला अलीरेजा अराफी यांना तात्पुरते इराणचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. अराफी यांना नेतृत्व परिषदेचे कायदेतज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यांना तात्पुरते सर्वोच्च नेत्याची भूमिका पार पाडण्याचे'' काम देण्यात आले आहे, असे वृत्तसंस्था इराणी स्टुडंट्स न्यूज एजन्सी ने दिले आहे. अयातुल्ला अली खामेनी यांच्या उत्तराधिकारी होण्याच्या शर्यतीत अराफी हे प्रमुख आघाडीवर होते. ६७ वर्षीय हे एक अनुभवी धर्मगुरू आणि खामेनी यांचे जवळचे सहकारी आहेत. अराफी सध्या सर्वोच्च नेत्याची नियुक्ती करणाऱ्या तज्ञांच्या सभेचे उपाध्यक्ष म्हणून काम करतात. ते इराणच्या मदरसा प्रणालीचेही प्रमुख आहे.

शनिवारी झालेल्या अमेरिका-इस्रायल लष्करी हल्ल्यात १९८९ पासून इराणचे नेतृत्व करणारे ८६ वर्षीय खामेनी ठार झाले. या कारवाईत लष्करी तळ, सरकारी सुविधा आणि वरिष्ठ कमांड साइट्सना लक्ष्य करण्यात आले, ज्यात संरक्षण मंत्री अमीर नासरजादेह आणि कमांडर-इन-चीफ मोहम्मद पाकपूर यांच्याशी संबंधित ठिकाणांचा समावेश होता. अंतरिम परिषदेत आता अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, मुख्य न्यायाधीश गुलाम-होसेन मोहसेनी-एजेई आणि पालक परिषदेतील धर्मगुरू यांचा समावेश आहे. खामेनी यांच्या निधनानंतर हे तिघेही एकत्रितपणे राज्य कारभाराचे मार्गदर्शन करतील.

हल्ल्यानंतर लगेचच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी खमेनी यांच्या मृत्यूची जाहीर घोषणा केली. एक्स वर, ट्रम्प यांनी लिहिले, ''इतिहासातील सर्वात वाईट लोकांपैकी एक, खामेनी मरण पावला आहे. हा केवळ इराणच्या लोकांसाठीच नाही तर सर्व महान अमेरिकन लोकांसाठी आणि जगभरातील अनेक देशांमधील लोकांसाठी न्याय आहे, ज्यांना खामेनी आणि त्यांच्या रक्तपिपासू गुंडांच्या टोळीने मारले आहे किंवा विकृत केले आहे.'' इराणने प्रथम ते दावे फेटाळले, नंतर रविवारी सकाळी मृत्यूच्या बातमीला दुजोरा दिला.

# नागपूरच्या काटोलमध्ये स्फोटकं बनवणाऱ्या कंपनीत भीषण स्फोट; १२ कामगारांचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर** – नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथून एक अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. राऊळगाव येथे असलेल्या कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास मोठा स्फोट झालाय. बारुद आणि त्यापासून डेटोनेटरसह इतर स्फोटक बनवणाऱ्या कंपनीत हा मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान या भीषण स्फोटात १२ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर अनेक जण जखमी झाल्याचीही माहिती आहे.

दरम्यान, या भीषण स्फोटानंतर परिसरात मोठा आवाज होऊन एकच खळबळ उडालीय. तर या भीषण स्फोटात जखमी कामगारांना जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर मोठ्या प्रमाणात झालेल्या स्फोटनंतर परिसरात आगही लागली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्नीशामक विभगाकडून बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. दुसरीकडे परिसरात मृतकांच्या नातेवाईकांनी परिसरात मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. नागरिकांमध्ये मोठा रोष उसळल्याचेही चित्र आता बघायला मिळत आहे. कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र या स्फोटाचे नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

दरम्यान, या स्फोटाच्या अपघातावर काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी १५ मृत्यू आणि २० जखमी झाले असल्याचे सांगितले आहे. या ठिकाणी कंपनीकडून सुरक्षितते बद्दल मोठं दुर्लक्ष असल्याचा आरोप त्यांनी केलाय. प्रशिक्षणा शिवाय आणि कुठलीही आवश्यक ती काळजी न घेता कामगार वापरले जातात, असा त्यांचा आरोप आहे.

दरम्यान, नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील आणि याच राऊळगाव शिवारातील कोतवालबड्डी शिवारातील एशियन फायर वर्क्स या एक्सप्लोसिव्ह कंपनीमध्येही वर्षभरापूर्वी (१६ फेब्रुवारी) दुपारी दोन वाजताच्या सुमारास एशियन फायर वर्क या कंपनी मध्ये मोठा स्फोट झाला होता. फटाक्यांची वात तयार करताना ही घटना घडली होती. स्फोटाच्या वेळेला कंपनीत मोठ्या संख्येने कामगार काम करत होते. मात्र, ज्या विशिष्ट प्लांटमध्ये हा स्फोट झाला, त्या ठिकाणी चार कामगार कार्यरत होते. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला होता, तर इतर दोघे जखमी झाले होते.

दरम्यान काटोल येथील आमच्या



पॅकिंग युनिटमध्ये झालेल्या दुःखद घटनेने आम्हाला खूप दुःख झाले आहे. या घटनेमुळे बाधित झालेल्या सहकाऱ्यांसोबत/कामगारांसोबत आणि कुटुंबांसोबत आमच्या संवेदना आहेत. त्यांचे कल्याण ही आता आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. आम्ही आपत्कालीन प्रतिसादांचे आयोजन करत आहोत आणि बाधितांना सर्व शक्य मदत आणि वैद्यकीय मदत देत आहोत. आमचे पथक बचाव कार्य सुनिश्चित करण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत मिळून काम करत आहे. आम्ही चालू तपासात अधिकाऱ्यांना सहकार्य करत आहोत. आमच्या सर्व ऑपरेशन्समध्ये कडक सुरक्षा मानके राखण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. घटनेची आमची अंतर्गत चौकशी सुरू आहे. उपलब्ध होताच अपडेट्स दिले जातील. असं एसबीएल एनर्जीकडून जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# धर्माच्या आधारावरचे विभाजनाचे राजकारण हाणून पाडा–रमेश चेन्नीथला

**आत्ताच एक्सप्रेस**

**चिपळूण** – देशात सर्वधर्मसमभावाची भूमिका कायम ठेवणाऱ्या काँग्रेसने सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन राजकारण केले आहे. मात्र गेल्या बारा वर्षांत भाजपाने हिंदू-मुस्लीम वाद निर्माण करून समाजात फूट पाडण्याचे राजकारण सुरू केले आहे. सामाजिक सौहार्द बिघडवण्याचे हे षडयंत्र हाणून पाडा, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केले.

कोकण विभागातील लोकप्रतिनिधींच्या तीन दिवसीय निवासी कार्यशाळेची रविवारी सांगता झाली. चिपळूण येथे आयोजित शिबिराच्या समारोपप्रसंगी ऑनलाईन संबोधित करताना चेन्नीथला म्हणाले, निवडणुकांत जय-पराजय होत असतात; पराभवाने खचून न जाता संघटना मजबूत करण्यावर भर द्यावा. तालुका, जिल्हा, ब्लॉक, वॉर्ड आणि बूथ पातळीवर पक्षबांधणी बळकट करा. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांचे हात बळकट करा. 'काँग्रेसचा शिपाई' म्हणून काम केल्यास पक्षाला गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या शिबिरास प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, माजी खासदार हुसेन दलवाई, आमदार भाई जगताप यांच्यासह प्रदेश पदाधिकारी, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरानंतर पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ म्हणाले, चिपळूणमधील कार्यशाळेतून नेतृत्व विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आघाडीचे राजकारण ही अपरिहार्यता असली तरी कोकणात त्याचा पक्षाला फटका बसला. आगामी काळात कोकणात संघटना मजबूत करण्यावर भर दिला जाईल. तळागाळातील कार्यकर्त्यांना या शिबिरातून ऊर्जा व प्रोत्साहन मिळेल, असा दावा त्यांनी केला. संगमेश्वर येथील स्वराज्यरक्षक संभाजी महाराजांच्या स्मारकाची दुरवस्था झाल्याचा आरोप करत सपकाळ यांनी राज्य सरकारवर टीका केली. स्मारक उभारणीच्या घोषणा वारंवार करूनही अंमलबजावणी झालेली नाही, हे महायुती सरकारच्या निष्क्रियतेचे लक्षण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी स्मारकाबाबत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

# कधी कधी आम्ही ठरवून सभागृह तहकूब करतो, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हेंनी फोडले सत्ताधारी - विरोधकांतील गुपित

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक** – राजकारणात आरोप – प्रत्यारोप नेहमीच सुरू असतात. पण त्यानंतरही पडद्यामागे वेगळीच समीकरणे जुळत असतात. हीच समीकरणे उघड करणारे एक विधान विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केले आहे. कधी कधी आम्ही ठरवून सभागृह तहकूब करतो, असे सांगत त्यांनी सत्ताधारी व विरोधकांतील पडद्यामागील समन्वय उघड केला. त्यांच्या या विधानामुळे सभागृहातील गदारोळामागचे खरे राजकारण काय? यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

नाशिक येथील विश्व मराठी संमेलनात बोलताना नीलम गोऱ्हे यांनी वरील खुलासा केला. त्यांना परिसंवादात विधानभवनात होत असलेला गदारोळ हा कोणत्या व्याकरणाचा अलंकार आहे? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्या म्हणाल्या, विरोधक सभागृहात काही प्रश्नांवर गदारोळ घालतात. अर्थातच ते जो गदारोळ करतात त्यांची अपेक्षा असते की, त्यांना बोलायला मिळावे. उदाहरणार्थ, एखाद्या मंत्र्याच्या कार्यालयात पैसे सापडले. अशावेळी विरोधकांना चर्चा करायची



असते. पण नियम असा आहे की, त्यांना अगोदर नोटीस द्यावी लागेल. मग मंत्र्यांवर आरोप करता येतील.

८ दिवसांपूर्वी मुंबई – पुणे महामार्ग बंद पडला. पण तो तारांकित प्रश्न होण्यासाठी त्याची मुदत गेलेली असते. विरोधी पक्ष हा त्याचा धर्म व जबाबदारी पाळत असतो. तर सत्ताधारी पक्ष हा बुद्धिबळाच्या पटलावर ज्याप्रमाणे दोन प्रकारची व्यूहरचना केली असते तशाच प्रकारच्या चालीचे पालन करत असतो. त्यातही एक सीक्रेट असते. सकाळीच आम्हाला विरोधक किती वेळ गदारोळ करणार हे ठावूक असते. तुम्ही किती वेळात सभात्याग करणार आहात? असा प्रश्नही आम्ही त्यांना करतो. काहीवेळा पीठासीन अधिकाऱ्याने १५ मिनिटे थांबायचे आणि सुरुळीत कामकाज करायचे असेही ठरलेले असते, असे त्या म्हणाल्या.

# श्री गुरु तेग बहादुरांच्या शौर्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा–प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात ध्वनिचित्रफितीद्वारे प्रधानमंत्र्यांचा संदेश

नवी मुंबई/खारघर दि.१ (प्रतिनिधी)– महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागमाच्या माध्यमातून आपण महान परंपरेचे साक्षीदार होत आहोत. गुरुंनी दिलेला त्याग आणि सामाजिक एकतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे, असा संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे दिला.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्या वतीने खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचा संदेश ध्वनिचित्रफितीद्वारे दाखविण्यात आला.

प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले की, गुरुंनी त्यागाची पराकाष्ठा केली. त्या काळात समाजातील सर्व घटक एकत्र उभे राहिले. सत्य आणि संस्कृतीसाठी ठाम राहण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. या सामाजिक एकतेच्या महायज्ञात गुरु गोविंद सिंह आणि गुरु नानक नाम लेवा संगत यांची महत्त्वाची भूमिका होती. आज देशाला पुन्हा सामाजिक एकतेची गरज असताना हा समागम आश्वासक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यात्रेची सुरुवात गेल्या वर्षी नागपूर येथून झाली. त्यानंतर तख्त श्री हजूर साहिब, नांदेड येथे कार्यक्रम पार पडला आणि आता नवी मुंबईत हा समागम महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. या उपक्रमाद्वारे श्री गुरु तेग बहादुर यांचा शौर्यपूर्ण इतिहास महाराष्ट्रातील हजारो गावांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. या आयोजनाबद्दल प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले.

देशभरात श्री गुरु तेग बहादुर



साहिबजी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होत असल्याचे सांगत हरियाणातील कुरुक्षेत्र येथे झालेल्या भव्य कार्यक्रमात सहभागी होण्याचा अनुभव त्यांनी सांगितला. केंद्र सरकार गुरु श्री तेग बहादुर यांच्या संबंधित प्रत्येक ऐतिहासिक प्रसंग राष्ट्रीय स्तरावर साजरा करत आहे. ४००वा प्रकाश पर्व, स्मृतिचिन्ह टपाल तिकीट आणि विशेष नाण्याचे प्रकाशन, तसेच गुरु नानक देव यांचा ५५०वा प्रकाश पर्व श्रद्धेने साजरा करण्यात आल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. साहिबजाद्यांच्या सन्मानार्थ 'वीर बाल दिवस' साजरा करण्याची परंपराही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

शीख समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सांगितले की, करतारपूर साहिब कॉरिडॉर विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आला. श्री हेमकुंड साहिब यात्रेसाठी सुविधा उभारण्यात आल्या. शीख संघटना आणि गुरुद्वारांशी संबंधित संस्थांना एफसीआरए अंतर्गत सवलती देण्यात आल्या. शीख इतिहासाला अभ्यासक्रम आणि सांस्कृतिक चर्चेत स्थान देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

अफगाणिस्तानातील शीख बांधवांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि गुरु ग्रंथ साहिब यांच्या सन्मानासाठी सरकारने मिशन मोडमध्ये काम केले. गुरु ग्रंथ साहिबांचे स्वरूप सुरक्षितपणे भारतात आणण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील शीख कुटुंबांसाठी पुनर्वसन पॅकेज लागू करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

शीख समाजाच्या श्रद्धेचा सन्मान आणि त्यांच्या प्रगतीसाठी नवे मार्ग निर्माण करणे ही आमची जबाबदारी असून ही सेवा करण्याचे आम्हाला सौभाग्य लाभले आहे, असे नमूद करत त्यांनी नवी पिढी गुरुंच्या साहस आणि सत्याच्या मूल्यांशी जोडली गेली पाहिजे, असे आवाहन केले. इतिहास केवळ स्मरणात न ठेवता तो आचरणात आणणे हेच या समागमाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

# शांततेसाठी खंडणी?

'शांतता मंडळ'सारख्या कल्पना जगात खरोखर शांतता आणतील, की जग अधिक अस्थिर करतील ? शांततेसाठी पैसे देण्याची संकल्पना ऐकायला व्यवहार्य वाटू शकते, पण तिच्या मुळाशी असलेला विचार धोकादायक आहे. नऊ हजार कोटी रुपये आम्हाला द्या, आम्ही तुमचे संरक्षण करतो' इति डोनाल्ड ट्रम्प. धगधगत्या गाझामध्ये शांतता नांदावी यासाठीच्या 'शांतता मंडळा'चे उद्घाटन दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेच्या परिघात करण्यात आले. त्यावेळी एक प्रारंभिक चार्टर/सनद सार्वजनिकरीत्या दाखवली गेली. या उपक्रमाला अमेरिकेने जवळपास ६० देशांना आमंत्रित केल्याचे आणि त्यापैकी अनेक देशांनी आमंत्रण स्वीकारल्याचे/प्रतिसाद दिला. सनदेच्या मसुद्यातील एक महत्त्वाचे कलम असे आहे, की प्रत्येक देशाला पहिल्या तीन वर्षांचे सदस्यत्व मिळण्यासाठी कोणत्याही देयकाची गरज नाही; मात्र 'स्थायी सदस्यत्व' मिळविण्यासाठी प्रत्येक देशाने किमान एक अब्ज डॉलर (म्हणजे ९३०० कोटी रुपये) जमा करावेत, असे नमूद आहे. हे कलम आणि पैसे गाझाच्या पुनर्निर्माणासाठी वापरले जातील, असे अनेक आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांनी म्हटले आहे. या मंडळात सहभागाचा निर्णय पाकिस्तानच्या परराष्ट्र खात्याने अधिकृतरीत्या जाहीर केला. तसेच सौदी अरेबिया, तुर्की, कतार, संयुक्त अरब अमिराती, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया यांसारख्या मुस्लिमांचे प्राबल्य असलेल्या काही देशांनी सहभागी होण्याचे संकेत दिले, किंवा त्यांनी निमंत्रण स्वीकारले. हंगेरी आणि व्हिएतनाम यांसारख्या काही देशांनीही निमंत्रण स्वीकारले. जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, नॉर्वे आणि स्पेन असे अनेक युरोपीय देश आणि काही पाश्चिमात्य देशांनी सहभागास स्पष्ट नकार दिला, किंवा सावध भूमिका घेतली. त्यामुळे हा उपक्रम संपूर्णपणे सार्वत्रिक आहे, असे मानता येणार नाही. यामुळे एक वास्तव समोर आणले आहे, ते म्हणजे जागतिक राजकारण आदर्शवादाकडून वेगाने व्यवहारवादाकडे झुकत आहे. 'पैशावर आधारित संरक्षण संकल्पना' हा कोणताही अधिकृत करार नाही. गेल्या काही वर्षांत अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात दिसून आलेल्या एका बदलत्या विचारसरणीचे ते प्रतिबिंब आहे. या संकल्पनेची मुळे २०१६ नंतरच्या काळात, विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजकीय उदयानंतर स्पष्टपणे दिसू लागली. २०१६च्या अमेरिकी अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचारादरम्यान ट्रम्प यांनी प्रथमच नाटो आणि अमेरिकेच्या पारंपरिक मित्रदेशांवर 'मोफत संरक्षण' घेत असल्याचा आरोप केला. सन २०१७मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी नाटो सदस्य देशांवर संरक्षण खर्च वाढवण्यासाठी थेट दबाव टाकण्यास सुरुवात केली. अमेरिकेचे संरक्षण हे कोणतेही दान नसून त्याची किंमत मोजावी लागेल, अशी भूमिका त्यांनी उघडपणे मांडली. सन २०१८ आणि २०१९ या काळात ही भूमिका अधिक आक्रमक झाली. नाटो परिषदांमध्ये ट्रम्प यांनी जर्मनी, फ्रान्स आणि इतर युरोपीय देशांवर संरक्षण खर्चासाठी जीडीपीच्या ठरावीक टक्क्यांपेक्षा कमी योगदान देत असल्याचा आरोप केला. सन २०२०पर्यंत अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात बहुपक्षीय संस्थांऐवजी द्विपक्षीय, व्यवहाराधारित करारांवर भर देण्याची प्रवृत्ती स्पष्ट झाली. या पार्श्वभूमीवर 'सुरक्षा म्हणजे सेवा, आणि सेवेची किंमत द्यावी लागते' हा विचार हळूहळू आकार घेत गेला. सन २४-२५च्या निवडणूक प्रचारात ही संकल्पना पुन्हा चर्चेत आली. ट्रम्प किंवा त्यांच्या जवळच्या राजकीय वर्तुळातून काही वेळा असे संकेत दिले गेले, की अमेरिकेचे संरक्षण हवे असेल, तर संबंधित देशांनी त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक योगदान द्यावे. या संकल्पनेचा मूळ उद्देश अमेरिकेचा जागतिक संरक्षणावरील खर्च कमी करणे, मित्रदेशांना आर्थिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणे आणि आंतरराष्ट्रीय संबंध अधिक व्यवहाराधारित बनवणे हा आहे. या संदर्भात 'प्रोटेक्शन मनी' ही संकल्पना जागतिक स्तरावर अतिशय वादग्रस्त ठरली आहे. अनेक देश आणि तज्ज्ञांच्या मते ही भूमिका आंतरराष्ट्रीय संबंधांचे व्यापारीकरण करते. त्यामुळे ही संकल्पना काहींना दबावतंत्र किंवा राजकीय सौदेबाजीचा प्रकार वाटतो. महत्त्वाचा प्रश्न असा, की कुठले देश या छत्राखाली प्रत्यक्षात एकत्र आले आहेत का? तर, औपचारिकरीत्या तसे काहीही झालेले नाही. कारण मुळात ही कोणतीही संघटना नाही, तिची सनद नाही, सदस्यत्वाचे निकष नाहीत आणि कोणतीही अधिकृत घोषणा किंवा करार सध्यातरी अस्तित्वात नाही. याउलट अनेक देशांनी या विचारसरणीला उघड किंवा अप्रत्यक्ष विरोध दर्शवला आहे. जर्मनी, फ्रान्स आणि इतर काही युरोपीय राष्ट्रांनी नाटोचे सामूहिक संरक्षणाचे तत्त्व व्यवहाराधारित करणे धोकादायक असल्याचे म्हटले आहे. त्यांचा युक्तिवाद असा आहे, की संरक्षण ही केवळ आर्थिक देवाणघेवाण नसून दीर्घकालीन विश्वास आणि सामूहिक जबाबदारीवर उभी असलेली संकल्पना आहे. विकसनशील देशांमध्येही ही भूमिका अस्वस्थता निर्माण करणारी ठरली आहे. कारण अशा व्यवस्थेत श्रीमंत देश सुरक्षित राहतील आणि गरीब देश अधिक असुरक्षित होतील, अशी भीती व्यक्त केली जाते. चीन आणि रशिया यांनी या संकल्पनेचा थेट निषेध करताना, अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक व्यवस्थेतील विसंगती अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्या मते, ही भूमिका बहुपक्षीयता दुबळी करून जगाला अधिक अस्थिर करेल. भारताच्या दृष्टीने पाहता, भारताने या संदर्भात पारंपरिकपणे धोरणात्मक स्वायत्तता जपली आहे आणि कोणत्याही एका शक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहण्याऐवजी बहुपक्षीय मंचांचा वापर केला आहे. त्यामुळे भारतासह अनेक देशांनी नाटोसदृष्य व्यवहाराधारित सुरक्षेऐवजी ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना आणि इतर प्रादेशिक मंचांवर भर दिलेला दिसतो. परस्पर व्यापार, आर्थिक विकास बँका आणि राजकीय समन्वय हे अनेक देशांना अधिक समतोल आणि सशर्त नसलेले पर्याय वाटत आहेत. सामूहिक संरक्षणाच्या तत्त्वावरचा विश्वास जर आर्थिक सौद्यांवर अवलंबून राहिला, तर दीर्घकालीन एकजूट कमजोर होऊ शकते. त्यामुळे 'नाटो' संस्थात्मकदृष्ट्या टिकून राहील; पण त्याची एकात्म भावना आणि विश्वासार्हता कमी होण्याची शक्यता आहे. अखेरीस असे म्हणावे लागेल की 'पैशावर आधारित संरक्षण संकल्पना' ही मानसिकता संरक्षणाचे व्यापारीकरण करते, राजकारणाचे सौदेकरण वाढवते आणि जागतिक विश्वासव्यवस्थेवर ताण आणते. याच प्रतिक्रियेतून ब्रिक्स आणि बहुध्रुवीय पर्यायांना अधिक चालना मिळत आहे, आणि भविष्यात जागतिक व्यवस्था अधिक विभाजित व अनिश्चित होण्याची चिन्हे दिसत आहेत.  या पार्श्वभूमीवर खरा प्रश्न असा उरतो की 'शांतता मंडळ'सारख्या कल्पना जगात खरोखर शांतता आणणार आहेत, की अधिक अस्थिर करणार आहेत? शांततेसाठी पैसे देण्याची संकल्पना ऐकायला व्यवहार्य वाटू शकते, पण तिच्या मुळाशी असलेला विचार धोकादायक आहे. कारण जर सुरक्षा आणि शांतता या मूल्यांनाही आर्थिक क्षमतेच्या चौकटीत बंदिस्त केले, तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था श्रीमंत आणि गरीब, शक्तिशाली आणि दुर्बल अशा स्पष्ट गटांत विभागली जाईल. अशा परिस्थितीत शांतता सार्वत्रिक ध्येय न राहता, ती खरेदी-विक्रीची वस्तू बनेल.

# राष्ट्रपतींच्या भेटीने शेगाव संत नगरीत चैतन्याचे वातावरण



देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकतीच बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव या संतनगरीला भेट देऊन श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले. त्याला निमित्त झाले होते ते शेगाव येथे आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यावतीने आयोजित आरोग्य शिबीर आणि आरोग्य परिषदेच्या उद्घाटनाचे. हे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवरही राष्ट्रपतींसोबत या संमेलनासाठी उपस्थित होते.

शेगाव हे बुलढाणा जिल्ह्यातील अकोला आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असणारे एक छोटेसे गाव, सध्या शेगाव हा तालुका झाला आहे. एरवी या गावाची लोकसंख्या जेमतेम एक लाखांच्या आसपास असावी. या गावाला खरे महत्त्व प्राप्त झाले आहे ते महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात या परिसरातील करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराज यांच्या समाधीस्थळामुळे. श्री संत गजानन महाराज यांचे वास्तव्य दीर्घकाळ शेगाव येथेच राहिले होते. १९०९ साली त्यांनी शेगाव येथे समाधी घेतली. त्यानंतर तिथे त्यांचे मंदिर उभे झाले आणि आज शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. इथे फक्त भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही गजानन महाराजांचे भक्त दर्शनाला येत असतात. श्री गजानन महाराज यांनी केलेल्या लोककल्याणकारी कार्याबद्दल तसेच त्यांच्या दैवी चमत्काराबद्दल अनेक कथा इथे सांगितल्या जातात. श्री संत गजानन महाराजांची पोथी देखील आज अनेक कुटुंबांमध्ये नियमित वाचली जाते आणि गावोगावी गजानन महाराजांची मंदिरे देखील उभी राहिलेली आहेत. त्यावरून त्यांचे भक्त किती मोठ्या प्रमाणात आहेत हे दिसून येते.

सुरुवातीला इथे फक्त महाराजांची समाधी होती. नंतर मंदिर झाले, आता तिथे चार-पाच मोठे भक्तनिवासही झाले आहेत. त्याशिवाय इतरही सुसज्ज अशी व्यवस्था तिथे निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे लाखो भाविक इथे दर्शनाला येत असतात. त्यांची निवासाची व्यवस्था अत्यल्प दरात होत असते, तसेच भोजनादी सेवा देखील इथे होत असते. त्यामुळे हे स्थान कायम गजबजलेलेच असते. शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे सरकारने धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करायला हवा. तसेच हे गाव मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गाजवळ वसलेले आहे. काही ठिकाणी सुधारणांना सुरुवात झाली आहे. एरवी मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गावर शेगाव हे स्टेशन फक्त गजानन महाराज भक्तांसाठीच ओळखीचे राहिले. अन्यथा बाकी प्रवाशांसाठी शेगाव रेल्वे स्टेशनवर कचोरी चांगली मिळते म्हणून लोक आठवणीने चौकशी करतात. मात्र आज त्या कचोरीलाही जुनी चव राहिलेली नाही.

संत गजानन महाराज संस्थानच्या व्यवस्थापनाने इथे व्यवस्था देखील अत्यंत चोख अशी ठेवलेली आहे. मात्र असे असले तरी आजवर या श्रद्धास्थानाला देशाचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती यांनी कधीही भेट दिली नव्हती. पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळात ज्यावेळी सोमनाथ मंदिराचे लोकार्पण झाले त्यावेळी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद लोकार्पणाला जाणार कळल्यावर पंडित नेहरू चांगलेच नाराज झाले होते आणि त्यांनी राजेंद्र प्रसाद यांना सोमनाथला जाण्यासाठी विरोधही केला होता अशी इतिहासात नोंद आहे. एकदा उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत हे इथल्या आनंद सागर प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभासाठी येऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले होते. त्यानंतर गेल्या २३-२४ वर्षांत द्रौपदी मुर्मु यांनी श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. याआधी बुलढाणा जिल्ह्यातील मुकुल वासनिक हे देखील केंद्रीय मंत्री होते. मात्र ते काँग्रेसचे मंत्री असल्यामुळे त्यांनी कधी कोणत्याही अतिविशिष्ट व्यक्तीला शेगावला आणण्याचे प्रयत्न केले नव्हते. तो योग प्रतापराव जाधव यांच्यामुळे आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येणार म्हणजे पूर्ण शासकीय यंत्रणा कामाला लागणार हे ओघानेच आले. त्यांच्या या कार्यक्रमासाठी सरकारी यंत्रणेने सुमारे तीन महिने आधीपासून मागे लागून संपूर्ण गाव अगदी चकाचक करून ठेवले. गावात बऱ्याच सुधारणा देखील झाल्या.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शेगावला आल्या. त्यांनी शेगावला महाराजांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले. श्री संत गजानन महाराज यांनी लोककल्याणासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले होते. त्यांचा गण गण गणात बोते हा मंत्र सर्व जीवांना समानतेचा संदेश देतो असे राष्ट्रपतींनी यावेळी नमूद केले. पूर्ण मंदिर परिसर त्यांनी न्याहाळला आणि संपूर्ण माहिती घेतली. त्यानंतरच त्या अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाने आयोजित कार्यक्रम स्थळी रवाना झाल्या. यावेळी मुर्मू म्हणाल्या की, देश बलशाली करायचा असेल तर इथले नागरिक निरोगी हवेत आणि त्यासाठी आयुर्वेदच महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. मानवी जीवनात वनौषधी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे जंगले वाचवणे आणि वनौषधींची मोठ्या प्रमाणात लागवड करून त्याची जपणूक आणि संवर्धन करणे हे गरजेचे असल्याचे नमूद केले. आज औषधी वनस्पतींवरून आयुर्वेदात अनेक औषधे तयार केली जातात. त्यावरही मोठ्या प्रमाणात संशोधन होणे आणि आयुर्वेदाचा मानवी जीवनात जास्तीत जास्त उपयोग करून घेणे गरजेचे असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. आरोग्य मंत्रालय हे देशातील आरोग्यवस्थेवर देखरेख करते आणि नियंत्रण करते. मात्र संशोधनात्मक बाबींकडे त्यांना लक्ष देणे होत नाही. म्हणूनच सरकारने आयुष मंत्रालयाची स्थापना केली. त्यायोगे औषधीविषयक संशोधन केले जाईल आणि प्राचीन भारतीय आरोग्यवस्थेवर संशोधन देखील करता येईल असेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच केंद्राप्रमाणेच प्रत्येक राज्यात आयुष मंत्रालय स्थापन करून त्या त्या राज्यातील आरोग्यविषयक संशोधनांना उत्तेजन कसे देता येईल हा प्रयत्न केला जाणार असल्याचे केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले, तर भारतीय आहार पद्धतीत पूर्वापार औषधी तत्त्वे असलेल्या वनस्पतींचाच वापर होत आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला कधीही आजारपण उद्भवू नये अशी सोय असलेली पारंपरिक ज्ञानावर आधारित आपली जीवनपद्धती होती, याकडे राज्यपाल देवाव्रत आचार्य यांनी लक्ष वेधले.

आपल्या आहारात अनावश्यक पदार्थांचा अंतर्भाव झाल्यामुळे आजार वाढल्याचे प्रमाण दिसून आले आहे. त्यामुळे आयुर्वेद जीवन पद्धतीनुसार जीवन जगल्यास आजार कमी होतील, असेही राज्यपालांनी सांगितले. एकूणच राष्ट्रपतींच्या या दौऱ्यामुळे शेगावमध्ये चैतन्य निर्माण झाले होते. हे चैतन्य असेच कायम टिकावे अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

# राष्ट्र, संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी श्री गुरू तेग बहादुर यांची अमर शहादत

''जिन्हूं न निंदा दुखी करदी है, न उसतत खुश करदी है: जो मान-अपमान नूं बराबर समझदा है...'' या गुरुबाणीतील ओळींमधून नववे गुरू श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी स्थिरचित्त, निर्भय आणि निस्पृह जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवला. निंदा-स्तुती, हर्ष-शोक, मान-अपमान यापलीकडे जाऊन सत्यासाठी उभे राहण्याची शिकवण त्यांनी केवळ शब्दांनी नाही, तर आपल्या जीवनातून आणि शहिदीतून दिली. त्यागमल ते मतेग बहादुरफ - शौर्य आणि अध्यात्माचा संगम : सहावे गुरू श्री गुरू हरगोबिंद जी यांच्या पुत्राचे बालनाव 'त्यागमल' होते. करतारपूरच्या युद्धात त्यांनी दाखवलेल्या अद्वितीय पराक्रमामुळे त्यांना 'तेग बहादुर' म्हणजेच 'शूर तलवारबाज' हे नाव प्राप्त झाले. शौर्य आणि त्याग यांचा अद्वितीय संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. आठवे गुरू श्री गुरू हरकृष्ण जी यांच्या निधनानंतर १६६५ मध्ये ते गुरू गादीवर विराजमान झाले. पंजाबमधील बाबा बकाला येथे त्यांनी नववे गुरू म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि शीख पंथाला नवे आध्यात्मिक नेतृत्व दिले. एक ओंकार ते सर्वधर्म समभाव: पहिले गुरू श्री गुरू नानक देव जी यांनी दिलेला 'एक ओंकार'चा संदेश केवळ धार्मिक नव्हता, तर सामाजिक समतेचा ध्वज होता. जात-पात, उच्च-नीच, भेदभाव यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार त्यांनी दिला. लंगर परंपरेतून समानतेचा प्रत्यक्ष अनुभव दिला. हीच परंपरा पुढे नेत श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे रक्षण आपले ध्येय मानले.

**अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा**



मुघलकालीन दडपशाहीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा निरपराध नागरिकांवर अन्याय होत होता, तेव्हा जनतेने श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांना साद घातली. त्यांनी दिल्लीकडे प्रस्थान केले आणि धर्मस्वातंत्र्यासाठी निर्भयपणे उभे राहिले. त्यांचे सहकारी भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाला यांना अमानुष छळ सहन करावा लागला. पण गुरुजी डगमगले नाहीत. ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौक येथे, आज जिथे गुरुद्वारा शीश गंज साहिब उभा आहे, त्या ठिकाणी त्यांनी शिर अर्पण केले. त्यांनी धर्मांतर किंवा चमत्कार दाखवण्यास नकार देत शहादत स्वीकारली. त्यांच्या या सर्वोच्च त्यागामुळे त्यांना 'हिंद दी चादर' ही पदवी लाभली म्हणजेच हिंदुस्थानच्या धर्म-संस्कृतीचे रक्षण करणारी ढाल. अंतिम संस्कार आणि अमर स्मृती : शहादतीनंतर त्यांच्या पार्थिवाचे अंतिम संस्कार करण्यास बंदी होती; परंतु लखी शाह बंजारा यांनी आपल्या घराला अग्नी देऊन गुरुजींचे अंत्यसंस्कार केले. त्या स्थळी आज गुरुद्वारा रकाब गंज साहिब उभारण्यात आला आहे. त्यांचे शिर भाई जैताजी यांनी आनंदपूर साहिब येथे नेऊन दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंह यांच्याकडे सुपूर्द केले. त्या ठिकाणी आज आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ आहे. श्री गुरू गोविंद सिंह यांनी त्यांच्या दोह्यात लिहिले: ''शीख दिया पर सिरर न दिया, धर्म हेतु साका जिन किया।'' बलिदानाचा खरा अर्थ : श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान कोणत्याही व्यक्ती विरोधात नव्हते; ते असहिष्णुतेच्या विचारसरणीविरुद्ध होते. त्यांनी केवळ आपले शिर दिले नाही, तर जगण्याचा मार्ग दिला अन्यायासमोर न झुकण्याचा, सत्यासाठी उभे राहण्याचा आणि मानवतेची सेवा करण्याचा. भारतीय संस्कृती 'वसुधैव कुटुंबकम्', सर्वधर्म समभाव आणि सहजीवनाचा संदेश देते. हजारो मतमतांतरे असूनही एकत्र राहण्याची क्षमता हीच भारतीयत्वाची खरी ओळख आहे.

**आजच्या पिढीसाठी संदेश**

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत आहे; परंतु विकास केवळ आर्थिक नसतो; तो मूल्याधिष्ठित असतो. सत्य, साहस, त्याग, कर्तव्य आणि समभाव हीच गुरू परंपरेची देणगी आहे. आजच्या युवकांसाठी श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांची शहादत ही केवळ इतिहासातील घटना नाही; ती जीवनाची दिशा आहे. संत भगत नामदेवांचा संदेश संत भगत नामदेव म्हणतात: ''ऐसा गुरू वडभागी पाइआ, जिनि हउमै मारि सबदि मिलाइआ।'' अहंकार नष्ट करून परमसत्याशी एकरूप करणारा गुरू भाग्यानेच लाभतो. श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे जीवन हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. राष्ट्र, संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान हे भारतीय इतिहासातील सुवर्णपान आहे. त्यांच्या शहादतीतून आपण असा भारत घडवण्याची प्रतिज्ञा करू या जिथे सहिष्णुता, न्याय, मानवाधिकार आणि वैश्विक शांतता सर्वोच्च असतील. हीच त्यांना खरी आदरांजली.

**ऐतिहासिक नाते**

हिंद-दी-चादर कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानाचे स्मरण राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागामार्फत आयोजित कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. स्वातंत्र्याची जपणूक, श्रद्धेचे स्वातंत्र्य, मानवतेचे रक्षण व मानवी प्रतिष्ठेसाठी दिलेल्या त्यांच्या सर्वोच्च शहिदीचे हे कालातीत प्रतीक आहे.

हा ऐतिहासिक स्मरणोत्सव बहुदिवसीय, व्यापक स्वरूपातील सार्वजनिक कार्यक्रम म्हणून आयोजित करण्यात येत असून, त्यामध्ये आध्यात्मिक साधना, ऐतिहासिक जागृती, युवकांचा सहभाग तसेच सामाजिक एकात्मता यांचा समन्वय साधण्यात येत आहे. प्रथमच या उपक्रमांच्या माध्यमातून शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी तसेच भगत नामदेव संप्रदाय अशा श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्याशी ऐतिहासिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक नाते असलेल्या समुदायांना एका व्यासपीठावर आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहे. ३५० वर्षांनंतर या ऐतिहासिक नात्याचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण करण्याचा राज्य शासनाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. या कार्यक्रमांमध्ये आध्यात्मिक प्रवचने, कीर्तन, ऐतिहासिक प्रदर्शन, शैक्षणिक सादरीकरणे तसेच समुदाय संवाद यांचा समावेश असून, श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांचे जीवन, कार्य, शिकवण व त्याग यांचे सखोल दर्शन घडविले जात आहे. गुरुजींच्या शहिदीचे ऐतिहासिक महत्त्व व संविधानिक मूल्ये- धर्मस्वातंत्र्य, समानता व न्याय- यांच्याशी असलेले त्यांचे नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे.

या कार्यक्रमातून गुरुजींच्या काळात बंजारा व लबाना समाजाने दिलेल्या सहकार्यावर प्रकाश टाकण्यात येत आहे. तसेच औरंगजेबाच्या राजवटीत अत्यंत धोकादायक परस्थितीतही श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांचे अंत्यसंस्कार पार पाडणाऱ्यांनी दाखविलेल्या अपूर्व धैर्याचा गौरव करण्यात येत आहे. यासोबतच, श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत खंबीरपणे सोबत राहिलेल्या मोहयाल समाजातील भाई मती दास जी, भाई सती दास जी व भाई दयाला जी यांच्या सर्वोच्च शहिदीलाही मानवंदना देण्यात येत आहे. श्री गुरू नानक देव जी यांच्या परंपरेनुसार सिंधी समाज हा या उपक्रमाचा अविभाज्य भाग आहे. ''गुरू नानक नाम लेवा संगत'' या संकल्पनेखाली या शिकवणींवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना एका समान व्यासपीठावर आणण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे सेवा भावनेतून आयोजित करण्यात येणारा भव्य लंगर, जो गुरुजींच्या समानता, करुणा व निःस्वार्थ सेवेच्या मूल्यांचे प्रतीक आहे. केंद्र सरकारतर्फेदेखील विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले असून श्री गुरू तेग बहादूरजींशी संबंधित कर्तारपूर कॉरिडॉरचे काम पूर्ण करणे असो, हेमकुंड साहिब येथे रोपवे प्रकल्पाचे बांधकाम असो. किंवा आनंदपूर साहिब येथील विरासत-ए-खालसा संग्रहालयाचा विस्तार असो अशा गुरूंच्या प्रत्येक पवित्र स्थळाला आधुनिक भारताच्या दृष्टिकोनाशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

***

# छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर आयोजन वेळापत्रक जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १'' प्रभावीपणे राबविण्यासाठी हिंगोली तालुक्यातील शिबीराचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

नोडल अधिकारीः ज्या त्या मंडळातील मंडळ अधिकारी करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कनेरगाव नाका | ०७/०३/२०२६ |
| २. | सिरसम | ०७/०३/२०२६ |
| ३. | वासंवा | १४/०३/२०२६ |
| ४. | भांडेगाव | १०/०४/२०२६ |
| ५. | डिग्रस कन्हाळे | १७/०४/२०२६ |
| ६. | खानापुर चित्ता | २४/०४/२०२६ |
| ७. | नर्सी नामदेव | ०२/०५/२०२६ |
| ८. | हिंगोली शहर | ०८/०५/२०२६ |
| ९. | हिंगोली ग्रामीण | १५/०५/२०२६ |

वरील प्रमाणे नियुक्ती केलेल्या मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी आदेशात निश्चीत केलेल्या तारखेला ठरवुन दिलेल्या महसूल मंडळाच्या ठिकाणी शिबीराचे आयोजन करुन शिबीर यशस्वीरित्या पार पाडावे शिबीर पार पाडल्यानंतर त्याच दिवशी त्याबाबतचा अहवाल सोबतच्या विवरणपत्रामध्ये विहीत नमुन्यात छायाचित्रीकरणासह या कार्यालयास सादर करावे.

सदरील कामात टाळाटाळ अथवा दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे आवाहन तहसीलदार हिंगोली यांनी केले आहे.

सदरील पत्राच्या प्रतिलीपी१. मा. जिल्हाधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.२. मा. उपविभागीय अधिकारी हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.,३. मुख्यधिकारी नगरपरिषद हिंगोली यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.,४. गट विकास अधिकारी पंचायत समिती हिंगोली यांना देवुन कळविण्यात येते की, आयोजीत केलेल्या शिबोराच्या ठिकाणी जागा, पिण्याचे पाणी, स्वच्छता इ. बाबत आपलें स्तरावरुन संबधीत ग्रामसेवक यांना आदेशीत करावे.,५. ६. उप अधिक्षक भूमी अभिलेख हिंगोली यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.तालुका कृषी अधिकारी हिंगोली यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

७.पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगोली, बासंवा नर्सी ना. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.८. मुख्याध्यापक प्रा.शा. यांना देवून सुचित करण्यात येते की, आपले शालेय विद्यार्थ्यांचे विविध प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यासाठी संबधीत आपले सरकार सेवा केंद्राशी संपर्क साधुन शिबीराच्या अगोदर पूर्वतयारी करणेस्तव.९. श्री. लोंढे जिल्हा समन्वयक महा आयटी हिंगोली यांना देवुन कळवण्यात येते की संबधीत केंद्र चालकांना शिबीरा बाबत पूर्व तयारी करुन उपस्थित राहण्यास कळवावे.१०. ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.११. संबधीतास अनुपालनास्तव.

# पोलीस अधीक्षक यांच्या संकल्पनेतून हस्तगत केलेला मुद्द्यामाल मुद्देमाल ५१.६१.७२० रु फिर्यादीस परत

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांचे संकल्पनेतून हिंगोली जिल्हा घटकातील पो. स्टे.चे गुन्हयातील आरोपीकडुन हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत मोहीम राबवुन एकुण - ५३,६१,७२०/- रुपयाचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपुर्वक परत केला आहे.

डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे संकल्पनेतुन हिंगोली जिल्हा घटकातील बाकरुन जास्तीत जास्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत हिंगोली जिल्हा घटकातील सर्व पो.स्टे. स्तरावर मोहीम राबविण्याबाबत सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या होत्या.

त्याअनुषंगाने दिनांक २८/०२/२०२६ रोजी हिंगोली जिल्हा घटकातील सर्व पो.स्टे. स्तरावर गुन्हयात आरोपीकडुन हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल, फिर्यादीस परत करण्याबाबत मोहीम राबविण्यात आली असुन सदर मोहीमे दरम्यान जिल्हयातील एकुण ०६ गुन्हयातील सोन्या चांदीचे दागीने व नगदी असे किंमती ३६,७६,७२० /-रु, ०४ वाहने किंमत १,८०,०००/-रु, ७१ मोबाईल किमंती १५,०५०००/- असा एकुण ५३,६१,७२०/-रु मुद्देमाल माहे फेब्रुवारी महीण्यात फिर्यादीस परत करण्यात आला आहे. मा. पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी हिंगोली जिल्हयाचा चार्ज घेतल्यापासून आता पावेतो अशाच प्रकारची मोहीम राबवुन एकुण जप्त करण्यात आलेला मुद्देमाल विशेष कार्यक्रमाचे आयोजन करुन मुद्देमाल फिर्यादीस फिर्यादीस सन्मानपुर्वक असा एकुण ६२,२६,३२० /-(बासठ लाख सविश हजार तिनसे विस रूपय केवळ चा मुद्देमाल फिर्यादीस फिर्यादीस सन्मानपुर्वक परत करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी डॉ. नीलाभ रोहन पोलीस अधिक्षक हिंगोली, कमलेश मीना, अपर पोलीस अधीक्षक हिंगोली, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि मोहन बा. भोसले, स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली, पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, शिवसांब घेवारे, पोह/६० प्रेमदास पी. चव्हाण व सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.स्टे. चे मुद्देमाल मोहरील व सायबर सेलचे अधिकारी/कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेवुन पार पाडली आहे.

भविष्यात अशाच प्रकारे मोहीम राबवुन जास्तीत जास्त जप्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात येत आहे.

# ग्रेन मर्चंट असोसिएशन हिंगोली च्या वतीने मोढ़ा प्रीमियर लीग(क्रिकेट) सीज़न ४ सामने




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** ग्रेन मर्चंट असोसिएशन हिंगोली यांच्या वतीने व नमो चषक आज दिनांक १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मोढा प्रीमियर क्रिकेटचे लिग सीज़न ४ सामने आयोजित करण्यात आले या क्रिकेट सामन्याचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ व्यापारी रमेशचंद्र चांडक, राधेश्यामजी अग्रवाल, प्रकाशजी सोनी, नरेंद्रजी दोडल,बाबुशेठ बरडिया,अशोकजी मूंदड़ा, प्रकाशजी सोनी, ज्ञानेश्वरजी मामडे,रमेशचंदजी सोनी, मुरलीधरजी पांडे, सुरेशराव शिंदे, सत्यनारायण लोहिया, बालाप्रसादजी तापडिया,सुभाष अप्पा येवते, देविदासजी घुगे, राजेशजी भंडारी, पवन व्यास, दिलीपराव देशमुख, सुरज बोडखे, शिवशंकर घुगे व इतर व्यापारी हजर होते.

आयोजक :- राहुल सोनी ,सुमित चांडक,किसन सोमानी व ग्रेन मर्चंट असोसिएशन हिंगोली च्या वतीने दरवर्षी प्रीमियम क्रिकेटचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी क्रिकेट मॅच चे आयोजन करण्यात आले असून या सामन्यांसाठी एकूण १२ संघ सहभागी झाले होते.

# श्री गुरु तेग बहादुर शहिदी समागम कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेचे नियोजन




**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी मुंबई –** श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेने व्यापक तयारी केली. विविध विभागांच्या समन्वयातून भाविकांसाठी आवश्यक सेवा-सुविधांची प्रभावी व्यवस्था करण्यात आली.

कार्यक्रमस्थळी लाखो भाविकांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, टँकर व साठवण टाक्यांची व्यवस्था करण्यात आली. घनकचरा विभागाकडून शेकडो स्वच्छता कर्मचारी, घंटागाड्या व डस्टबिन्सच्या माध्यमातून परिसर स्वच्छ ठेवला गेला आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी २५०सुरक्षा रक्षक 'ट्रॅफिक वॉर्डन' व मदतनीस तैनात आहेत.

पाच बीएलएस व तीन एएलएस रुग्णवाहिका, १० आयसीयू बेडसह १०० बेडची व्यवस्था तसेच ८५० पेक्षा अधिक वैद्यकीय कर्मचारी कार्यकत आहेत. दिव्यांग व ज्येष्ठांसाठी १०० व्हीलचेअर्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नेत्रतपासणी शिबिर व औषधोपचाराची सुविधाही देण्यात आली आहे.

उद्यान विभागाकडून खारघर परिसरातील रस्ते व चौकांचे सुशोभीकरण करण्यात आले. अग्निशमन दलाकडून आपत्ती व्यवस्थापन कक्ष, पाणीसाठा व आवश्यक उपकरणे सज्ज ठेवण्यात आली. भाविकांसाठी ३० ठिकाणी निवास व्यवस्था करण्यात आली पिण्याचे पाणी व जीवनावश्यक साहित्य पुरविण्यात आले.

# दोन दिवसीय 'हिंगोली ग्रंथोत्सवा'चा उत्साहात समारोप, वाचन संस्कृती प्रसाराचा निर्धार




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** येथील कै. रं. रा. बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयाच्या प्रांगणात आयोजित दोन दिवसीय 'हिंगोली ग्रंथोत्सवा'चा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक हे होते.

या समारोप प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूरकर, प्रभाकर घुगे, प्रा. जी. पी. मुपकलवार, नामदेव वाबळे, संतोष ससे, कुंडलिकराव सरकटे, सिद्धलिंगअप्पा किर्तनकार, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक तसेच सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रभाकर घुगे यांनी वाचन संस्कृती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ग्रंथोत्सवाची संकल्पना राबविण्यात येत असल्याचे सांगितले. ग्रंथोत्सव हा केवळ कार्यक्रम न राहता 'लोकोत्सव' बनला पाहिजे, तसेच त्याचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. यामुळे ग्रंथालय विकासाला चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात खंडेराव सरनाईक यांनी बालकांमध्ये वाचनाची सवय व चळवळ निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली. ग्रामीण भागातील वाचनालयांनी बालवाचन कक्ष अधिक समृद्ध करून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावावी, असे त्यांनी आवाहन केले. तसेच ग्रंथोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. विलास खरात यांनी केले. यावेळी ग्रंथविक्रेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, पुस्तके व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात श्रीमती विद्याताई लाखकर यांनी 'पसायदान' सादर केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या समारोप कार्यक्रमास जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालयांचे प्रतिनिधी, ग्रंथपाल, शिक्षक, विद्यार्थी, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा ओझर येथे संपन्न

## वकील व्यवसाय हे समाजकार्याचे साधन-न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे –** समाजातील प्रत्येक घटकांना न्याय मिळवून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे वकिली व्यवसाय हा व्यवसाय नसून समाज कार्याचे साधन आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पुणे जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर यांनी केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर आणि तालुका बार असोसिएशनमार्फत श्री विघ्नहर सांस्कृतिक भवन, ओझर ता. जुन्नर येथे भव्य विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र के महाजन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष ॲड सुजीत शेलार, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड हेमंत हडावळे, वकील संघाचे पदाधिकारी, पक्षकार आदी उपस्थित होते.

न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर म्हणाले, शासकीय योजनांचा नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी पुणे जिल्हा हा नेहमीच अग्रेसर राहिल्याबद्दल जिल्ह्याचा पालक न्यायमूर्ती म्हणून अभिनंदन केले. शासनाच्यावतीने विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत असून या योजनांमुळे लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांना शासकीय योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी आयोजित आजचा विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास व्यक्त करुन या मेळाव्याचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन न्यायमुर्ती डॉक्टर यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती आणि जुन्नर तालुका बार असोसिएशनच्यवतीने विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित केल्याबद्दल न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर अभिनंदन केले.

समाजाच्या उन्नतीसाठी अशाप्रकारे महामेळावे महत्त्वपूर्ण- प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र के महाजन

श्री. महाजन म्हणाले, खेड-राजगुरूनगर, घोडेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा तसेच कायदेविषयक हक्कांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उदेशाने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजाच्या उन्नतीसाठी शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती व लाभ दुर्बल व वंचित घटकातील नागरिकांना देण्यासाठी अशाप्रकारे महामेळावे महत्त्वपूर्ण आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या रस्त्यांवरील वरील खड्डयामुळे होणारे मृत्यू आणि रस्ते सुरक्षेबाबत महत्वपूर्ण निकाल दिला आहे; नागरिकांच्या जीवन आणि सुरक्षिततेच्या अधिकाराचे रक्षण करणाऱ्या ऐतिहासिक निकालामध्ये नागरिकांच्या सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आली आहे.

खड्डयांमुळे होणारे नागरिकांचा मृत्यू झाल्यास ५ लाख रुपये भरपाई देण्यात यावी. जखमी झाल्यासः दुखापतीच्या तीव्रतेनुसार ५० हजार ते २ लाख ५० हजार रुपयादरम्यान नुकसान भरपाई मिळते.

नागरिकांचा मृत्यू झाल्यास मृतांच्या कायदेशीर वारसांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करावी. नुकसान भरपाई करिता जिल्हास्तरीय समितीकडे माहिती द्यावी. कारवाई न झाल्यास जिल्हा विधी सेवा सेवा प्राधिकरणाकडे पीडितांना किंवा कुटुंबियाना थेट दावे दाखल केल्यास त्यांना भरपाई किंवा उपाययोजनांचा पाठपुरावा करण्यास मदत करण्यात येते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आपआपसातील वाद समझोत्याने मिळविण्यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे १४ मार्च २०२६ रोजी जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात आयोजन करण्यात येणार आहे. लोक न्यायालयामध्ये प्रकरण मिटल्यास न्यायालयीन शुल्क नियमाप्रमाणे परत मिळू शकते. प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. लोक न्यायालयाच्या निकालावर अपील करता येत नाही. परस्पर संमतीने निकाल झाल्याने आपआपसात कटूता कमी होण्यास मदत होऊन वेळ व पैसा दोघांचीही बचत होते. त्यामुळे अधिकाधिक पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांनी केले.

श्री. वाघमारे म्हणाले, जन कल्याणाच्या विचार करता शासनाच्या योजना, उपक्रमाचा नागरिकांना लाभ देण्यासाठी उच्च न्यायालयदेखील पुढाकार घेत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना योजनांचे देण्यासाठी लाभ आरोग्य, कृषी, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन आदी विभागाचे स्टॉल लावण्यात आले आहे. जिल्ह्यात विद्यार्थ्यांची गुणवत्ता पूर्ण अत्याधुनिक पायाभूत सुविधांनीयुक्त मॉडेल शाळा व पुणे मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र आणि मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना उपक्रम राबविण्यात येत आहे, असेही श्री. वाघमारे म्हणाले. गिल्ल म्हणाले, पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस दलामार्फत वाहतूक नियमांचे पालन होण्याच्यादृष्टीने चित्रफीत प्रसारित करण्यात आली आहे. वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या सुमारे ७ हजार नागरिकांना प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. नागरिकाना कायद्याबाबत माहिती व्हावी याकरीता शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.




# हिंगोली जिल्हा शिक्षकेतर संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष सुवर्णमाला बलखंडे यांचा सेवापूर्ती समारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** महात्मा ज्योतीबा फुले विद्यालय,कळमनुरी येथील सेविका तथा हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती सुवर्णलता विश्वनाथ बलखंडे यांच्या सेवापूर्ती समारंभव दिनांक २८ फेब्रुवारी संपन्न झाला.

कळमनुरी येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अँड.अशोकराव सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून पंतगे सर.बहिर्जी संस्थेतील सर्व शिक्षक, प्राध्यापक, सेवक व सर्व कर्मचारी वर्ग तसेच वसमत येथील भोसले, कदम सर व इतर मान्यवर तसेच बलखंडे परीवारालील सर्व सदस्य पाहुणे, मित्र परीवार, विकास नगर मधील सर्व नगरवासी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन सी. एस. गरड यांनी केले अविळी मान्यवरांचे मनोगत व्यक्त झाले या मध्ये प्रा. पारटकर प्रा बनसकर, प्रा. शिंदे अँड. सावंत यांनी सुवर्णलताबाई बलखंडे यांच्या केलेल्या सेवेच्या कामीवर प्रकाश टाकण्यात आला त्यानी महात्मा फुले विद्यालयात ३५ वर्ष आपली सेवा आपण करून संस्थेत मोलाची भूमीका पार पाडली असून त्या एक संस्थेच्या परीवारातील सदस्या आहेत. व राहतील त्याचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्याचा मुलगा प्रा.विनोद बलखंडे यांनी सुद्धा आई विषयी मनोगत व्यक्त केले. सुवर्णलताबाई योनी आपली सेवा कशा प्रकारे प्रकारे पार पडली त्यांचे अनुभव माडले.

या कार्यक्रमाला आभार प्रदर्शन हे सुनिल ठाकरे सर यांनी मानले. यावेळी विद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# किनवट येथे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे भव्य स्वच्छता अभियान

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी राज्यभर ''स्वच्छता अभियान'' राबविण्यात आले. डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या ''स्वच्छ भारत अभियान'' संकल्पनेला बळ देणारे हे अभियान राज्यपालांनी नियुक्त केलेले स्वच्छता दूत तथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेने पार पडले.

प्रतिष्ठान हे संत शिकवणीवर आधारित समाजप्रबोधन करणारे सेवादायी व समाजाभिमुख कार्य करणारे जागतिक स्तरावरील संघटन असून निरुपणाद्वारे समाजजागृती, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण व संवर्धन, जलसंवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, महाआरोग्य शिबिरे व महास्वच्छता अभियान यांसारखे विविध उपक्रम सातत्याने राबवित आहे. १६ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या महास्वच्छता अभियानाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. तसेच डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना २६ जानेवारी २०१७ रोजी पद्मश्री पुरस्कार तर महाराष्ट्र शासनाने २०२३ मध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केला आहे.

किनवट येथे या अभियानांतर्गत बसस्थानक व बस आगार परिसर तसेच उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा ते मेन रोड या दोन प्रमुख ठिकाणी सकाळी ८.०० ते १०.३० या वेळेत स्वच्छता करण्यात आली. सुमारे ५००० चौ.मी. परिसर व १ कि.मी. रस्ता स्वच्छ करून सुमारे १२५० किलो कचरा संकलित करण्यात आला व तो डम्पिंग यार्डमध्ये पाठविण्यात आला. प्रतिष्ठानच्या ९० स्थानिक सदस्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला.



अभियानावेळी पोलीस निरीक्षक श्री. गणेश कराड, नगराध्यक्षांचे चिरंजीव श्री. करण भाऊ एन्ड्रलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच किनवट नगरपालिका व ग्रामपंचायत गोकुंदा येथील संबंधित अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे सहकार्य केले.

प्रतिष्ठानच्या या समाजहितैषी कार्याचे मान्यवरांनी कौतुक करून भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे स्वच्छ व निरोगी समाज निर्मितीस हातभार लावण्याचे आवाहन केले.

# बेलापूरमध्ये 'नॅशनल गांधी शिल्प बाजार'चे भव्य आयोजन

आत्ताच एक्सप्रेस

**नवी मुंबई** – भारतीय हस्तकला परंपरेचा समृद्ध वारसा अनुभवण्याची अनोखी संधी देणारा 'नॅशनल गांधी शिल्प बाजार' हा सर्व–भारतीय हस्तकला महोत्सव ऑफीस ऑफ द डेव्हलोपमेंट कमिशनर ( हँडिकॅर्फ्ट्स ) मिनिस्ट्री ऑफ टेक्सटाईल यांच्या प्रायोजकत्वाखाली ०६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत अर्बन हाट, सीबीडी बेलापुर, बेलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी संजय सावकारे, माननीय वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य मुख्य अतिथी, अम्रित राज, विकास आयुक्त (हस्तकला), वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार विशेष अतिथी, अंशू सिन्हा, प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन सायंकाळी ६.०० वाजता होणार आहे.

या प्रदर्शनाचे आयोजन महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित यांनी केले असून, प्रदर्शन सर्वसामान्य नागरिकांसाठी दररोज सकाळी १०.३० ते रात्री १०.०० (रविवारीही) खुले राहणार आहे.

वस्त्रोद्योग मंत्रालयाअंतर्गत कार्यरत विकास आयुक्त (हस्तकला) कार्यालय देशातील हस्तकलांचा संवर्धन, प्रसार आणि संरक्षण यासाठी विविध योजना राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'नॅशनल गांधी शिल्प बाजार' या प्रमुख विपणन उपक्रमाअंतर्गत देशभरातील कारागिरांना थेट ग्राहकांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येतो. यामुळे कारागिरांना ग्राहकांच्या आवडी–निवडी आणि बाजारातील प्रवाह समजून घेऊन आपल्या डिझाइन्समध्ये नावीन्य आणण्यास मदत होते.

या भव्य प्रदर्शनात देशभरातील सुमारे १५० मास्टर कारागीरशिल्पगुरू, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त, राज्य पुरस्कारप्राप्त व नामवंत कारागीरसहभागी होणार आहेत. विविध राज्यांतील पारंपरिक व आकर्षक हस्तकला वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध असतील.

# महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव समितीची निवड जाहीर

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**



**किनवट** – किनवट येथे महात्मा जोतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी आयोजित बैठकीत अध्यक्षपदी निखिल सर्पे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सचिवपदी सिद्धार्थ भरणे व आल्फ्रेड ठमके यांची निवड करण्यात आली.

समितीच्या उपाध्यक्षपदी आकाश सर्पे व अनिकेत भरणे, कोषाध्यक्षपदी संघर्ष घुले तर सहकोषाध्यक्षपदी अनिल कांबळे यांची निवड करण्यात आली.

बैठकीस सल्लागार व मार्गदर्शक म्हणून मारोती मुनेश्वर, दादाराव कयापाक, ॲड. मिलिंद सर्पे, रविकांत सर्पे, माधव कावळे, शंकर नगराळे, ॲड. किशोर मुनेश्वर, मनोहर पाटील, उमेश भरणे, विनोद भरणे, नितीन कावळे, यादवराव नगारे यांच्यासह युवक मंडळाचे कपील कावळे, सचिन हटकर, रवींद्र कांबळे, सुगत भरणे, सम्यक सर्पे, ब्रम्हानंद एडके, राजेश पाटील, शिलरत्न कावळे, सूरज भरणे, सचिन कावळे, अमोल इंगोले, प्रसेनजीत कावळे, गौतम पाटील, शुभम भवरे, बंटी भवरे, पंकज नगारे, लकी भरणे, प्रशांत ठमके, सुबोध परेकार, ॲड. सम्राट सर्पे, रुपेश भवरे, स्वप्नील सर्पे आदी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुबोध सर्पे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुगत नगराळे यांनी मानले.

संयुक्त जयंती निमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा समितीचा मानस असून महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, बुद्ध–भीम गीत गायन स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धा तसेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष निखिल सर्पे यांनी दिली.

समाजप्रबोधन व सामाजिक ऐक्य दृढ करण्याच्या उद्देशाने हा महोत्सव उत्साहात व मोठ्या सहभागातून साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शांतता समितीची बैठक संपन्न

## पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीत डिजे वाजणार नाही चा संकल्प

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – येणाऱ्या पवित्र होळी सन आणि रमजान तसेच बाबा सोनापिर उर्स निमित्य माहूरच्या पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शांतता समितीची बैठक पार पडली या बैठकीत यापुढे कुठल्याही सण उत्सव काळात डीजे वाजणार नाही असा संकल्प घेण्यात आला

श्रीक्षेत्र माहूर शहर हे तीर्थक्षेत्राचे ठिकाण असून येथे सण–उत्सवासह जयंती पुण्यतिथी यासह वर्षभर होणाऱ्या यात्रा महोत्सवात मिरवणुका निघत असतात तर लहान थोरांचे वाढदिवसही मोठ्या प्रमाणात साजरे होत असतात या ठिकाणी छोट्या मोठ्या आवाजात डीजे वर गाणे यासह इतर भाषणे वाजविले जात असल्याने अनेक वेळा शांतता कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याचा प्रसंग उद्भवतो त्यामुळे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी उपस्थितांना डिजे वाजवू नका असे आवाहन केल्याने झालेल्या बैठकीत यापुढे डीजे वाजणार नाही असं संकल्प शांतता समितीच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत सपोनी शरद घोडके पो उप नी पालसिंग ब्राह्मण पोऊपनि संदीप अन्येबोईनवाड गोपनीय शाखेचे पोका गजानन चव्हाण राष्ट्रवादीचे



तालुका अध्यक्ष मेघराज जाधव ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार जोशी सर ज्येष्ठ पत्रकार वसंतराव कपाटे भाजपाचे नगरसेवक गोपू महामुने एड जगदीश अडकिने भाजपाचे अजय पवार काँग्रेसचे नगरसेवक प्रतिनिधी निसार कुरेशी सुनील वानखेडे अर्जुन पवार संतोष जग्गू नाईक पत्रकार इलियास बावाणी राज ठाकूर शंकर भालेराव पवन चव्हाण यांचे सह मान्यवर उपस्थित होते

# जांब बुद्रुक बसस्थानकाजवळ भरधाव पिकअपने उडविले नागरिक; चालक मद्यधुंद अवस्थेत ताब्यात

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**मुखेड** – तालुक्यातील जांब बुद्रुक येथे आज सायंकाळच्या सुमारास बसस्थानक परिसरात भीषण अपघाताची घटना घडली. एमएच २६ बीई ३१७८ क्रमांकाच्या भरधाव पिकअप वाहनाने अचानक नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगत उभ्या असलेल्या नागरिकांना जोरदार धडक दिली. या अपघातात चार ते पाच जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पिकअप चालक



मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. धडकेत एक पुरुष व तीन महिला गंभीर जखमी झाले असून वाहन थांबविण्यासाठी धावपळ करणाऱ्या तीन युवकांनाही किरकोळ दुखापत झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच जांब चौकीचे जमादार कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत चालकाला ताब्यात घेतले. जखमींना तत्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीती व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून मद्यप्राशन करून वाहन चालविल्याचा आरोप सिद्ध झाल्यास चालकावर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# किडनी प्रत्यारोपणा नंतर यशस्वी जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा 'सन्मान' सोहळा संपन्न

आत्ताच एक्सप्रेस

**छत्रपती संभाजीनगर–** जागतिक किडनी दिनाच्या औचित्याने झेडटीसीसी आणि मेडिकव्हर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने किडनी प्रत्यारोपणानंतर यशस्वी, सक्षम आणि प्रेरणादायी जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा विशेष 'सन्मान' पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. समाजात किडनी प्रत्यारोपणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे तसेच प्रत्यारोपणानंतरही आयुष्य पूर्ण क्षमतेने जगता येते हा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हा सोहळा एमजीएम कॅम्पस येथील रुक्मिणी ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला. मराठवाड्यातील किडनी प्रत्यारोपणानंतर स्वावलंबी आणि सक्रिय जीवन जगणाऱ्या अडीचशेहून अधिक व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. जवळपास पाचशे जणांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

प्रत्यारोपणानंतर नोकरी, व्यवसाय, शेती, समाजकार्य, व्यापार, राजकारण, शिक्षण तसेच गृहिणी म्हणून कुटुंबीय जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी यशकथा उपस्थितांसाठी विशेष ठरल्या. त्यांच्या अनुभवांमुळे इतर रुग्णांना मानसिक बळ मिळण्यासोबतच अवयवदान व प्रत्यारोपण प्रक्रियेबाबत जनजागृतीस हातभार लागणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री संजय शिरसाट (पालक तथा सामाजिक न्याय मंत्री), डॉ भागवत कराड(मा. केंद्रीय राज्य अर्थ मंत्री) , डॉ दयानंद मोतीपवळे(वैद्यकीय सहायक संचालक) ,डॉ पारस मंडलेचा(आरोग्य अधिकारी, महानगर पालिका) डॉ मिलिंद वैष्णव (सचिव )व मेडिकोवर हॉस्पिटल चे रिजनल डायरेक्टर श्री नीरज लाल ,डॉ. सचिन सोनी किडनी विकार तज्ञ, डॉ. राहुल रुईकर किडनी विकार तज्ञ, मेडिकवर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ विशाल कुटे उपस्थित होते.

# कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करा –राज्यमंत्री योगेश कदम

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई** – रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाच्या अपार संधी आहेत. या भागात देश विदेशातील पर्यटक येत असतात. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दापोली तालुक्यात पर्यटक सुविधांची कामे सुरू आहेत. या पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दर्जेदार स्वरूपाची कामे करून पर्यटकांसाठी उत्तम सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात आयोजित कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत दिल्या.

बैठकीस मंत्रालयात ग्रामीण विकास विभागाचे उपसचिव सुभाष इंगळे, चिपळुण सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हर्षल चव्हाण उपस्थित होते, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी बैठकीत सहभाग घेतला. कामांचा आढावा घेत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, गावातील बचत गटांचा कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्यात यावा. बचतगटाच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात यावा.कर्दे ग्रामपंचायत हद्दीतील प्रशासकीय मान्यता मिळालेली कामे पूर्ण करावी. या कामांसाठी मिळालेला निधी विहित कालावधीत खर्च होण्याची दक्षता घ्यावी. कामांच्या दर्जाबाबत तडजोड केल्या जाणार नाही.

कर्दे खाडीवर पूल बांधणे, खाडी येथे संरक्षक बंधारा बांधणे तसेच कर्दे येथे समुद्र किनाऱ्यालगत सांस्कृतिक संकुल बांधकाम या कामांसाठी सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) ची परवानगी मिळण्याची कार्यवाही पूर्ण करावी. कर्दे परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने पूर्ण करावी, असेही राज्यमंत्री योगेश कदम यांनी सूचित केले.

# वाळू चोरी करणाऱ्या ट्रॅक्टर पकडला तराफे जाळले, महसूल पोलीस पथकांची संयुक्त कारवाई

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – माहूर तहसील कार्यालय तथा माहूर पोलीस स्टेशन सिंदखेड पोलीस स्टेशन हद्दीत वाळू चोरी होत असल्याची खबर लागताच प्रभारी तहसीलदार नातह कैलास जेठे सिंदखेडचे सपोनी रमेश जाधवर यांचे सह महसूल पोलिसांच्या पथकाने वाळू चोरी करून नेताना बाइ बाजार येथे एक ट्रॅक्टर पकडला तर राणी धानोरा गोकुळ गोंडेगाव हद्दीतील पैनगंगा नदी पात्रात वाळू उपसा करण्यासाठी तैनात करण्यात आलेले तराफे जाळून नष्ट केल्याची घटना दि १ रोजी घडली आहे

तहसील कार्यालय माहूर आणि पोलीस स्टेशन सिंदखेड च्या संयुक्त पथकाने मौजे गोकुळ येथील पैनगंगा नदीपात्रात रानीधानोरा आणि गोकुळ हया दोन्ही बाजूने नाकेबंदी केली. तसेच गोकुळ नदीपात्रात घुसखोरी केलेल्या राणीधानोरा येथील रेती तस्करांचे अजस्त्र तराफे जाळून नष्ट केले. सदर कारवाईत कैलास जेठे नायब तहसीलदार प्र. तह माहूर रमेश जाधवर सपोनि पोलीस ठाणे सिंदखेड, सी. पी. बाबर ग्राम महसूल अधिकारी परमेश्वर खिल्लारे शिपाई विलास शेडमाके वाहन चालक, सागर हिवाळे सुदर्शन जाधव महसूल सेवक आणि सिंदखेड पोलीस स्टेशनचे अंमलदार आणि पोलीस




कर्मचारी यांचा सहभाग होता.

वाई बाजार येथे अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर नायब तहसीलदार कैलास जेठे प्रभारी तहसीलदार यांच्या गौण खनिज पथकाने पकडून तहसील कार्यालय, माहूर येथे लावण्यात आला. सदर पथकात ग्राम महसूल अधिकारी राम ठाकरे,ग्राम महसूल अधिकारी दयानंद येरडलावार,पोलीस पाटील, वाई बाजार, महसूल सेवक कैलास खुपसे विवेक नागपुरे हे उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी–४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०–२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laxími offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813